# स्मरणपत्र-३/बदली/तात्काळ /महत्वाचे

क्रमांक/जिपना/पसंवि/स्था/८४५ /२०२०
कार्यालय:- पशुसंवर्धन विभाग, जि. प. नागपूर.
दिनांक :- १०.०७ .२०२०.

प्रति,

खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती नरखेड.

विषय :- श्री. एस.एन जांभळे. स.प.वि.अ. व श्री. अमित सावळीकर, पशुधन पर्यवेक्षक यांना तात्काळ कार्यमुक्त करणेबाबत.

संदर्भ :- १) या कार्यालयाचे आदेश क्रमांक/जिपना/पसंवि/स्था/१०५०/दि.०४ .०६.२०१९
२) या कार्यालयाचे आदेश क्रमांक/जिपना/पसंवि/स्था/१०५२/दि.०४ .०६.२०१९
३) या कार्यालयाचे आदेश क्रमांक/जिपना/पसंवि/स्था/१२३/दि.२३.०१ .२०२०
४) या कार्यालयाचे आदेश क्रमांक/जिपना/पसंवि/स्था/५३८/दि.२०.०४ .२०२०

उपरोक्त विषयांकित प्रकरणी आपणांस याद्वारे कळविण्यात येते की, श्री. एस.एन जांभळे, सहाय्यक पशुधन विकास अधिकारी, प.वै.द.श्रे.२ पिपळा (के.) तसेच श्री. अमित सावळीकर, पशुधन पर्यवेक्षक, पंचायत समिती नरखेड यांचे या कार्यालयाचे वरील संदर्भीय क्रमांक-०१ व ०२ चे आदेशान्वये प्रशासकीय स्थानांतरण होऊन त्यांची बदलीने पद्स्थापना अनुक्रमे पशु वैद्यकिय दवाखाना श्रेणी-१ महादुला, पं.स. रामटेक व पशु वैद्यकिय दवाखाना श्रेणी-१ अरोली पं.स. मौदा येथे झालेली आहे. त्यांना स्थानांतरणाचे ठिकाणी रुजु होण्यास आपणांस वरील **संदर्भीय क्र.०३ व ०४ चे पत्रान्वये** आपले कार्यालयातुन कार्यमुक्त करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. परंतु अजुन पर्यंत आपण त्यांना कार्यमुक्त केले नाही. याबाब्रत **वरिष्ठांकडुन वारंवार विचारणा होत असुन तिव्र नाराजी व्यक्त केलेली आहे. ही अत्यंत खेदाची बाब आहे.**

करीता याद्वारे आपणांस **पुनःश्च स्मरण करुन देण्यात येत आहे** की. हे पत्र प्राप्त होताच २४ तासांचे आंत संबंधीतांना त्यांचे स्थानांतरणाचे ठिकाणी रुजु होण्यास कार्यमुक्त करण्यात यावे व तसा कार्यपुर्ती अहवाल या कार्यालयास उलट-टपाली सादर करण्यात यावा. संबंधीतांना कार्यमुक्त न केल्यास याबाबतची सर्वस्वी जबाबदारी आपली राहिल व पुढील होणा-या कार्यवाहीस आपण व्यक्तीशः जबाबदार राहाल याची नोंद घ्यावी.

(डॉ. ए.जी. ठाकरे)
जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
जिल्हा परिषद नागपूर.

प्रतिलीपी:-

४) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर यांना माहितीस सविनय सादर
५) मा.अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर यांना माहितीस सविनय सादर
६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.),जिल्हा परिषद नागपूर यांना माहितीस सादर.

जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी